# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 14 April 2025

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १४ एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती आज सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

संसद भवन परिसरात प्रेरणा स्थळ इथं बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरीवंश, पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातल्या इतर सदस्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण केली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामाजिक संपर्क माध्यमावरच्या संदेशात, डॉ. आंबेडकर यांना अभिवादन केलं. त्यांच्या प्रेरणेमुळेच आज देश सामाजिक न्यायाचं स्वप्न साकार करण्यासाठी समर्पित वृत्तीनं कार्यरत आहे. त्यांची तत्व आणि आदर्श हे आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या निर्मितीला बळ आणि गती देईल, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

****

डॉक्टर आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी दादरच्या चैत्यभूमीवर, तसंच नागपूरमध्ये दीक्षाभूमीवर हजारो अनुयायी दाखल झाले आहेत. त्यांच्या सोयी–सुविधेसाठी प्रशासनानं जय्यत तयारी केली आहे.

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चैत्यभूमीवर बाबासाहेबांना अभिवादन केलं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक क्रांतीचे जनक होते. समानता प्रस्थापित करण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली आणि आधुनिक भारताचा पाया रचला, असं राज्यपाल यावेळी म्हणाले.

एकसंघ भारताचं श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साकारलेल्या संविधानाला जातं, असं मत मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केलं. कुठल्याही परिस्थितीत संवैधानिक मूल्यांपासून दूर न होता, संविधानानुसारच संकल्प करण्याचं आवाहन त्यांनी केलं,

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या भडकल गेट इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विविध पक्ष संघटनांच्या वतीने अभिवादन करण्यात येत आहे. पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, खासदार भागवत कराड यांनी बाबासाहेबांना आदरांजली वाहिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातही व्याख्यान, रक्तदान शिबिर असे विविध कार्यक्रम होत आहेत.

नांदेडमध्ये जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन केलं.

बीड शहरातल्या आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली आहे. शहरातल्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळा इथून सकाळी अभिवादन रॅली काढण्यात आली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज हरियाणाच्या दौर्‍यावर असून, विविध विकासकामांचं लोकार्पण त्यांच्या हस्ते होत आहे. हिसार ते अयोध्या या नव्यानं सुरू होणाऱ्या विमान उड्डाण सेवेची सुरुवात, तसंच हिसार विमानतळाच्या नवीन टर्मिनल

इमारतीची पायाभरणी त्यांच्या हस्ते झालं. यावेळी जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधानांनी, सर्वसमावेशक विकासासाठी भारतीय जनता पक्ष कटीबद्ध असल्याचं सांगितलं. दलित, गरीब, वंचित आणि मागास समुदायाच्या विकासासाठी काम करणं, हा आपल्या पक्षाचा मंत्र असल्याचं ते म्हणाले.

याशिवाय यमुनानगर इथं दीनबंधू छोटूराम औष्णिक वीज केंद्राच्या ८०० मेगावॅट आधुनिक औष्णिक वीज प्रकल्पाची, भारतमाला परियोजनेअंतर्गत सुमारे १७० कोटी रुपये किमतीच्या सुमारे साडे चौदा किलोमीटर रेवाडी बाह्य वळणमार्गाचं उद्घाटनही पंतप्रधान करणार आहेत.

****

फरार हिरे व्यापारी मेहुल चोकसी याला बेल्जियम पोलिसांनी अटक केली. पंजाब नॅशनल बँक कर्ज घोटाळा प्रकरणात ही अटक झाली. केंद्रीय अन्वेषण विभाग – सीबीआयची विनंती आणि मुंबईतल्या एका न्यायालयाकडून दोन अटक वॉरंटच्या आधारे बेल्जियम पोलिसांनी ही कारवाई केली. जानेवारी २०१८ मध्ये मेहुल चोकसी भारतातून फरार झाला होता.

****

परभणी जिल्ह्यात पूर्णा तालुक्यातल्या कातनेश्वर इथल्या श्री कांचनेश्वर देवस्थान इथं काल पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यानिमित्त भरवण्यात आलेल्या यात्रेतही भाविकांनी मोठी गर्दी केली असून आठवडाभर विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. आज याठिकाणी कुस्तीची दंगल होणार आहे.

****

'संवाद मराठवाड्याशी' या नाविन्यपूर्ण उपक्रमाअंतर्गत छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे उद्या नागरीकांशी वेबिनारद्वारे संवाद साधणार आहेत.

****